**ठळक बातम्या**

- बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी प्रचंड बहुमताने विजयी, ८९ जागा जिंकत भाजपा ठरला सर्वात मोठा पक्ष

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरात दौऱ्यावर; ९ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विकास योजनांचं भूमिपूजन आणि उद्घाटन करणार

- स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त देशभरात आदिवासी गौरव दिवस साजरा

**आणि**

- जम्मू काश्मीरमधे नौगाम पोलीस ठाण्यात स्फोट होऊन नऊ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने २४३ जागांपैकी २०२ जागा जिंकत प्रचंड बहुमत मिळवलं आहे. यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच बिहारमधे सरकार स्थापन करणार हे काल जाहीर झालेल्या निकालात स्पष्ट झालं. सरकार स्थापन करण्यासाठी १२२ जागांची आवश्यकता आहे, त्या तुलनेत रालोआचा हा विजय ऐतिहासिक मानला जात आहे. ८९ जागा जिंकत भाजपा बिहार विधानसभेतला सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर संयुक्त जनता दल ८५, लोकजनशक्ती पार्टी रामविलास १९, हिंदुस्तान आवामी मोर्चा ५, राष्ट्रीय लोक मोर्चा ४ जागांवर विजयी झाले. विरोधी पक्षांच्या महाआघाडीला केवळ ३५ जागा मिळाल्या. यात राजद २५, काँग्रेस ६, भाकप माले २, माकपला एका जागेवर यश आलं. एमआयएम पक्षाने पाच जागा जिंकत पुन्हा एकदा बिहारमधे आपली राजकीय ताकद दाखवून दिली आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. ६ आणि ११ नोव्हेंबरला दोन टप्प्यात झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत ६९ पूर्णांक १३ शतांश टक्के इतकं मतदान झालं.

बिहार विधानसभा निवडणुकीत रालोआचा विजय नवी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात साजरा झाला. बिहारी जनतेनं पुन्हा एकदा विकसित बिहारसाठी, समृद्ध बिहारसाठी मतदान केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

देशातल्या सात राज्यांमधल्या आठ विधानसभा पोटनिवडणुकीचे निकालही काल जाहीर झाले. यात भाजपा आणि काँग्रेस यांना प्रत्येकी दोन जागांवर विजय मिळाला. आम आदमी पार्टी, झारखंड मुक्ती मोर्चा, मिझो नॅशनल फ्रंट आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीला प्रत्येकी एक जागा मिळाली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरात दौऱ्यावर आहेत. स्वातंत्र्य सैनिक आणि आदिवासी समुदायाचे नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त आज आदिवासी गौरव दिवस साजरा होत आहे. यानिमित्ताने नर्मदा जिल्ह्यातल्या देडियापाडा इथं एका कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी सहभागी होणार आहेत. ते ९ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिकच्या विकास योजनांचं भूमिपूजन आणि उद्घाटन करणार आहेत. या विकास योजनांच्या माध्यमातून या भागातल्या आदिवासी समाजाचा विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्या जाणार आहेत.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत बांधलेल्या एक लाख घरांच्या गृहप्रवेश कार्यक्रमातही प्रधानमंत्री सहभागी होणार आहेत. आदिवासी भागात ७४८ किलोमीटरच्या नव्या रस्त्यांच्या कामांचं भूमिपूजनही मोदी करणार आहेत. तसंच नर्मदा जिल्ह्यातल्या देवमोगरा मंदिरात त्यांनी दर्शन घेतलं.

त्याआधी प्रधानमंत्री मोदी यांनी आज सकाळी सुरत इथं मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल कॉरिडॉरच्या बुलेट ट्रेन स्थानकाच्या कामाची पाहणी केली.

<><><><><>

आदिवासी समुदायाचे नेते, आणि स्वातंत्र्य सेनानी भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी देशभरात आज आदिवासी गौरव दिवस साजरा होत आहे. आजचा दिवस आदिवासी संस्कृतीच्या गौरवशाली इतिहासाचं महत्व अधोरेखित करतो. गेल्या काही वर्षांमध्ये आदिवासी गौरव सप्ताहाचं स्वरूप घेतलेल्या या उत्सवात

देशभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रदर्शनं आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. यंदा भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज नवी दिल्लीमध्ये संसद भवन संकुलात भगवान बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनीही बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी आज झारखंडच्या स्थापना दिनानिमित्त तेथील जनतेला शुभेच्छा दिल्या. भगवान बिरसा मुंडा यांच्या मातीतल्या प्रतीभाशाली आणि मेहनती लोकांनी राज्य आणि देशाचा गौरव वाढवला, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. आदिवासी संस्कृतीने समृद्ध भगवान बिरसा मुंडा यांच्या राज्याचा इतिहास साहस, संघर्ष आणि अभिमानाच्या गाथांनी व्यापला आहे, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टद्वारे झारखंड राज्याची प्रशंसा केली. तर धरती आबांच्या आदर्शांच्या मार्गावर चालून वीर शहिदांनी स्वतंत्र झारखंडचं स्वप्न साकार केलं, असं झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन म्हणाले.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधील नौगाम पोलीस ठाण्यात काल रात्री स्फोटकांचा अचानक स्फोट होऊन झालेल्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला. गृह मंत्रालयाच्या जम्मू आणि काश्मीर विभागाचे सहसचिव प्रशांत लोखंडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या स्फोटात २७ पोलीस, दोन महसूल अधिकारी आणि तीन नागरिक जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हरियाणाच्या फरीदाबाद इथून जप्त केलेल्या स्फोटकांची तपासणी सुरू असताना काल रात्री उशीरा हा स्फोट झाला. ही स्फोटकं पोलीस ठाण्याच्या परिसरात मोकळ्या जागेत सुरक्षित ठेवण्यात आली होती. न्यायसहाय्यक पथक याची तपासणी करत होतं. स्फोटामुळे पोलीस ठाणं आणि आसपासच्या काही इमारतींचंही नुकसान झालं आहे. स्फोटाच्या कारणाचा शोध सुरू आहे, असंही लोखंडे यांनी सांगितलं.

दरम्यान, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला. गुप्तचर आणि दहशतवाद विरोधी यंत्रणा बळकट करण्यासाठी केंद्र सरकारनं आता तरी जागं व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा सुरू झाल्यापासून ४६ कोटी गणना अर्ज वाटप झाल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं. उत्तरप्रदेशात सर्वाधिक १३ कोटी ७४ लाख अर्जांचं वाटप झालं आहे. तर पश्चिम बंगालमधे ७ कोटी ४ लाख गणना अर्ज वाटण्यात आले आहेत. या टप्प्यात ९ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधे मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण होणार आहे.

**<><><><><>**

पाकिस्ताननं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या तालिबान विरोधातल्या निर्बंधांसाठी गठित करण्यात आलेल्या समितीचं अध्यक्षपद, तसंच दहशतवाद विरोधी पॅनलचं सह अध्यक्षपद भूषवण्यावर भारतानं तीव्र आक्षेप नोंदवला आहे. स्वतःचे हितसंबंध जपणाऱ्या सदस्यांना परिषदेच्या अध्यक्षपदापासून दूर ठेवायला हवं, असं संयुक्त राष्ट्रांमधले भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी म्हटलं आहे. परिषदेच्या कामकाजाच्या पद्धतींवर काल आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये गेले अनेक दिवस संघर्ष सुरु आहे. तसंच विविध दहशतवादी गटांना आणि त्याच्या नेत्यांना पाकिस्ताननं आश्रय दिला असून, यात संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या गटांचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर भारतानं संयुक्त राष्ट्रांमध्ये आपली भूमिका स्पष्ट केली.

**<><><><><>**

अमेरिका आणि दक्षिण कोरियानं द्विपक्षीय सुरक्षा आणि व्यापार करारावर संयुक्त तथ्यपत्रक प्रसिद्ध करून परस्परांबरोबरचे संबंध नव्या पातळीवर नेले आहेत, असं अमेरिकेचे उप-परराष्ट्र सचिव क्रिस्तोफर लांदेऊ यांनी म्हटलं आहे. आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्युंग यांच्यात झालेल्या दोन बैठकींच्या निकालाची रूपरेषा सांगणारे दस्तऐवज दोन्ही देशांनी काल प्रसिद्ध केले. त्यानंतर ते बोलत होते. या बैठकांमध्ये

दोन्ही देशांनी आपले प्राधान्यक्रम निश्चित केले असून, यात परकीय चलन बाजार स्थैर्य राखणं, महत्त्वाच्या उद्योगांची पुनर्बांधणी आणि विस्तार, परकीय चलन बाजारात स्थैर्य राखणं, व्यावसायिक संबंध वाढवणं आणि दोन्ही देशांमधली सागरी आणि आण्विक भागीदारी पुढे नेणं, याचा समावेश असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

कोलकाता इथं इडन गार्डनमध्ये सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आज भारतानं पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेवर आतापर्यंत नाममात्र आघाडी घेतली आहे. भारतानं काल दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावात गुंडाळला. भारतातर्फे जसप्रीत बुमराहनं अवघ्या २७ धावा देत ५ बळी घेतले. महम्मद सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन तर अक्षर पटेलनं एक गडी बाद केला.

त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या भारताचा पहिला गडी लवकर बाद झाल्यावर भारताच्या के एल राहुल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी दुसऱ्या गड्यासाठी अर्धशतकी भागीदारी केली. मात्र, त्यानंतर भारताचे फलंदाजही ठराविक अंतरानं बाद होत गेले.

आज दुसऱ्या दिवशी सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ८ बाद १८९ धावा झाल्या होत्या. भारताचा कर्णधार शुभमन गिलला दुखापतीमुळे 4 धावांवर माघारी परतावं लागलं.

**<><><><><>**

मुंबईसह महाराष्ट्रात गेले काही दिवस पहाटे आणि रात्रीच्या तापमानात घट दिसून येत आहे. वातावरणातला उष्मा कमी झाल्यामुळे मुंबई उपनगरी रेल्वे प्रवाशांना थोडा दिलासा मिळाला आहे. छत्तीसगड, मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, झारखंड आणि उत्तर प्रदेशमध्ये उद्यापर्यंत थंडीची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर तामिळनाडू, पुडुचेरी, कराईकल, केरळ, माहे, आंध्र प्रदेशची किनारपट्टी, यानम, रायलसीमा आणि अंदमान निकोबार बेटांवर पुढले दोन दिवस मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, राजधानी दिल्ली परिसरातल्या हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं राजधानी आणि आसपासच्या प्रदेशात श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती योजनेचा तिसरा टप्पा लागू केला आहे.

**//<><><><><>//**